# महाराष्ट्र शासन

## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

दुरध्वनी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com

79

क्र.महसुल/ कांदळवन/कावि-१९८/२०२० दिनांक :२७/०१/२०२०

प्रति,
मा.उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय : मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र.१५ मध्ये मनपान पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा टाकलेला कचरा, भराव काढुन कांदळवनाची लागवड, पाणथळ समितीकडुन कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार

संदर्भ : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे अर्जदार श्री.धीरज परब यांनी दाखल केलेली तक्रार अ.क्र.७९

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे श्री.धीरज परब यांनी दाखल केलेली तक्रार या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेली आहे. (तक्रार अ.क्र.७९ )

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने मा.अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीने वनविभाग, पोलीस निरीक्षक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, मिरा भाईंदर महानगरपालिका व तक्रारदार यांचेसोबत स्थळपहाणी करुन त्याबाबचा अहवाल देण्याबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपाहणी निश्चित करणेत आली.

त्यानुसार स्थळपाहणी दरम्यान या कार्यालयाकडील नायब तहसिलदार, पोलीस अधिकारी-कर्मचारी, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी भाईंदर व संबधित तलाठी यांनी अर्जदार यांचे समवेत विषयांकित जागेची दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपहाणी केली असुन मंडळ अधिकारी भाईंदर यांनी त्यांचेकडील पत्र जा.बा.नि.क्र.१२८/२०१९-२० दि.०३/०१/२०२० अन्वये खालील प्रमाणे एकत्रित स्थळपहाणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

स्थळपाहणी दरम्यान मौजे नवघर येथील स.नं.१५ मधील अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले तक्रारीचे ठिकाण हे शंकर नारायण महाविद्यालयाचे क्रीडांगणाच्या उजव्या बाजुस असलेल्या जागे संबंधित असुन प्रत्यक्ष स्थळ पहाणी दरम्यान अर्जदार यांच्या तक्रारी अर्जात नमुद केल्याप्रमाणे चौकशी केली असता अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी कांदळवना लगत उभारण्यात आलेले श्री रामा रामनाथ यादव याचे तबेल्याचे अंदाजे ४०x४० फुट तात्पुरती शेड व त्यालगत असलेल्या चाळीचे बांधकाम दिसुन आले. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे शौचालयाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. आजरोजी प्रत्यक्ष स्थळपहाणी दरम्यान कांदळवनाची कत्तल अथवा -हास होत असल्याबाबत आढळुन आलेले नाही.

सदर तक्रारीबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.महसूल/कांदळवन/कावि-१९८/२०२० दि.२२/०१/२०२० अन्वये प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष स्थळपाहणी व अर्जदार यांचे मागणीनुसार नमुद ठिकाणी प्रस्तुत बांधकाम पूर्णपणे तोडणेबाबतची कारवाई तात्काळ करणेबाबत कळविले आहे.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 289
दिनांक 4/3/2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी, Geo Tagging सह फोटो व मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ अहवाल सादर केलेला आहे.

**(डॉ. नंदकिशोर देशमुख)**
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**

प्रत : मा.जिल्हाधिकारी ठाणे (महसूल शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर